महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645

क्र. मासंवि/मावक/२१४१७
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : managerbcrrc@gmail.com
Website : www.mahadiscom.in

**दिनांक : ०६/०९/२०१८**

# परिपत्रक

**विषय :** बिंदू नामावली नोंदवही तपासणीबाबत.

-----------------

महावितरण कंपनीमधील परिमंडळांतर्गत विभागीय स्तरापर्यंतच्या प्रवर्गनिहाय (पदनिहाय) बिंदूनामावली नोंदवहया अद्ययावत स्वरुपात ठेवणे बंधनकारक असून शासनाकडून त्यांची तपासणी करुन घेण्याबाबतची कार्यवाही करणेची जबाबदारी प्रत्येक क्षेत्रिय कार्यालयाची आहे. या अनुषंगाने संबंधित सहाय्यक आयुक्त, मागासवर्ग कक्ष यांचेकडून बिंदूनामावली नोंदवहयांची तपासणी करुन घेण्याबाबतच्या सूचना यापूर्वी वेळोवेळी पारित करण्यात आलेल्या आहेत.

२. तथापि, उपरोक्त सूचनांच्या अनुषंगाने बिंदूनामावली नोंदवही तपसणीबाबत आढावा घेतला असता असे निदर्शनास आले आहे की, बऱ्याच कार्यालयाकडून सदर नोंदवहया विहित कालावधीमध्ये तपासून घेण्यात येत नाहीत/आलेल्या नाहीत. तसेच तपासणीअंती संबंधित सहाय्यक आयुक्त, मावक कक्ष यांनी दिलेल्या शेऱ्यानुसार दर्शविण्यात आलेल्या त्रुटींची पूर्तता विहित कालावधीत करण्यात येत नाही. सदरची बाब अतिशय गंभीर स्वरुपाची असून महाराष्ट्र विधानमंडळाच्या अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती कल्याण समितीच्या वेळोवेळी आयोजित केलेल्या दौऱ्यांच्या बैठकांमध्ये प्रकर्षाने दिसून आले आहे.

३. सर्व संबंधित कार्यालय प्रमुखांना आदेशित करण्यात येते की, त्यांचे कार्यालयाच्या अखत्यारितील बिंदूनामावली नोंदवहया अद्ययावत करुन संबंधित सहाय्यक आयुक्त, मागासवर्ग कक्ष यांचेकडून विहित कालावधीनुसार तपासणी करुन घेण्याबाबत व त्रुटींची पूर्तता करणेबाबत दिनांक ३०/०९/२०१८ पूर्वी त्वरीत कार्यवाही करावी. तसेच सदरच्या कार्यवाहीत दिरंगाई झाल्यास संबंधित कार्यालय प्रमुख व मासं विभागातील प्रमुखावर जबाबदारी निश्चित करण्यात येईल, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

४. सदर परिपत्रक महावितरण कंपनीच्या R-APDRP Portal वर उपलब्ध करण्यात आले आहे.

(चंद्रशेखर येरमे)
कार्यकारी संचालक (मासं)

D:\BCR\CIRCULAR\Roster Circular 06.09.2018.docx